# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.comWebsite : http://jdhepanvel.org दूरध्वनी व फॅक्सांबर (०२२) २७४५ ३८२०.

**क्र. विससं/उशि/कोविप/वेतन/प्राचार्य/२०२१/ 1426** **दिनांक :०८.०७.२०२१**

**प्रति,**

**प्राचार्य,**
**सर्व अधिनस्थ अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य,**
**विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, जि. ठाणे**
**पालघर, रायगड, रत्नागिरी, व सिंधुदूर्ग -**

विषय :- मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र. ६३४/२०१६
महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल्स असोसिएशन ऑफ नॉन - गव्हर्नमेंट कॉलेजेस विरुध्द
महाराष्ट्र शासन व इतर ...

संदर्भ :-१. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक न्यायाप्र-२०१७/प्र.क्र.३९७/१७/विशी-११
दि. ०५ मे, २०२१
२.मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण पुणे यांचे आदेश क्र. युएनआय/संकिर्ण/वेतनश्रेणी/६३४/
२०१६/६४५६, दिनांक १०.०५.२०२१
३.प्रस्तूत कार्यालयाचे दि. १७.०५.२०२१ रोजीचे कार्यालयीन आदेश

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले होते की, महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल्स असोसिएशन ऑफ नॉन - गव्हर्नमेंट कॉलेजेस यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ६३४/२०१६ दाखल करुन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. ३०.०६.२०१० च्या अधिसुचनेतील तरतूदीप्रमाणे दिनांक ०१ जानेवारी २००६ रोजी किंवा त्यानंतर प्राचार्य पदावर सरळसेवेने / थेट नियुक्ती झालेल्या (Directly recruited) वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्याची ६ व्या वेतन आयोगातील वेतनबॅड रु. ३७४००-६७००० व ॲकॅडमिक ग्रेड वेतन रु. १००००/- या वेतनसंरचनेत रु. ४३०००/- इतक्या किमान वेतनावर वेतननिश्चिती करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे संदर्भीय पत्र क्र.२ नुसार पात्र प्राचार्यांना देय ठरणारी रक्कम अदा करण्याबाबत कळविलेले आहे.

संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये कळविण्यात आल्याप्रमाणे अद्याप महाविद्यालया कडून प्रस्ताव या कार्यालयास सादर झाल्याचे दिसून येत नाही तरी, **संदर्भीय शासन निर्णयानुसार पात्र प्राचार्यांना पुनश्चः कळविण्यात येते की, त्यांनी त्यांची सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन निश्चिती प्रस्तूत कार्यालयाकडून तात्काळ करुन घेवून त्याची लेखाअधिकारी, उच्च शिक्षण कोकण विभाग, पनवेल यांचे कडून त्यांची पडताळणी करुन दि. १३.०७.२०२१ पर्यंत तात्काळ फरकाचे विवरणपत्र सादर करावे. दि. १३.७.२०२१ नंतर विलंबाने प्रस्ताव सादर केल्यास सदरचे प्रस्ताव या कार्यालयाकडून स्विकारले जाणार नाही. व त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील. याची नोंद घ्यावी.**

**(डॉ. संजय जगताप)**
**विभागीय सहसंचालक**
**उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल**

Scanned by CamScanner